| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 4853/ 2024 | श्री. विरेंद्र सिताराम वाघ, रा. कमान मोहल्ला, खुलताबाद ता.खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल), तहसिल कार्यालय खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 2 | 8075/ 2024 | श्री. विरेंद्र सिताराम वाघ, रा. जुनी स्टेट बँकेच्या मागे, खुलताबाद ता. खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर | निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 3 | 8493/ 2024 | श्री. विरेंद्र सिताराम वाघ, रा. जुनी स्टेट बँक जवळ खुलताबाद ता. खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा, भडजी ता.खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 4 | 8497/ 2024 | श्री. विरेंद्र सिताराम वाघ, रा. जुनी स्टेट बँक जवळ खुलताबाद ता. खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा, भडजी ता.खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 5 | 1443/ 2024 | श्री. महेश शंकरलाल शंकरपल्ली, रा. माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-1), तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 6 | 2025/ 2024 | श्री. महेश शंकरलाल शंकरपल्ली, रा. माँ दुर्गा निवास शास्त्री कॉलनी, सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 7 | 2031/ 2024 | श्री. महेश शंकरलाल शंकरपल्ली, रा. माँ दुर्गा निवास शास्त्री कॉलनी, सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 8 | 5715/ 2024 | श्री. महेश शंकरलाल शंकरपल्ली, रा. माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी, सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 9 | 5716/ 2024 | श्री. महेश शंकरलाल शंकरपल्ली, रा. माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी, सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 10 | 1444/ 2024 | श्री. योगेश भिमन लोध व्दारा. माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-1), तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 1445/ 2024 | श्री. योगेश भिमन लोधे व्दारा. माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-1), तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 12 | 1468/ 2024 | श्री. अब्दुल रहीम शमशुल हक, रा. बिलाल नगर बिलाल मस्जीद रोड, सिल्लोड ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 13 | 1469/ 2024 | श्री. अब्दुल रहीम शमशुल हक, रा. बिलाल नगर बिलाल मस्जीद रोड, सिल्लोड ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-1), तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 14 | 1983/ 2024 | श्री. शेख मुश्ताक इसाक, रा. शाहनगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 15 | 2034/ 2024 | श्री. फकिरा कडुबा कळम, रा. भवन ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | मंडळ अधिकारी, सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 16 | 2039/ 2024 | श्री. सय्यद सुलतान सय्यद इसा रा. गंगा जमुना रोड, अजिंठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तलाठी तलाठी सजा सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 17 | 4115/ 2024 | श्री. केशव रामा बनकर रा. गोळेगाव खु ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 18 | 4752/ 2024 | श्री. सय्यद सुलतान सय्यद इसा, रा. गंगाजमुना रोड, अजिंठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 19 | 7026/ 2024 | श्री. शेख भिकु शेख बेग, मु.पो. पालोद ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 20 | 7326/ 2024 | श्री. इब्राहीम खान दिलावर खान, ईमेल-Khani5265@gmial.com | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 7327/ 2024 | श्री. इब्राहीम खान दिलावर खान, ईमेल-Khani5265@gmial.com | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 22 | 7330/ 2024 | श्री. इब्राहीम खान दिलावर खान, ईमेल-Khani5265@gmial.com | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 23 | 1567/ 2024 | श्री. ई.टी. काळे, रा. खुपटा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल), तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 24 | 6227/ 2024 | श्री. ई.टी. काळे रा. खुपटा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 25 | 9387/ 2024 | श्री. ई.टी. काळे, रा. खुपटा ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (संगोयो), तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 26 | 236/2 024 | श्री. सुभाष परभतराव खमाट, मु. उमरावती पो. आळंद ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 27 | 4443/ 2024 | श्री. नरेंद्र उत्तमराव देशमुख मु.पो. वारेगाव ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 28 | 6249/ 2024 | श्री. उमेश सांडु कुंटे, रा. बोधेगाव बु ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 29 | 7762/ 2024 | श्री. बाळासाहेब विठ्ठल कुंटे, रा. बोधेगांव बु ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 30 | 11019 /2024 | श्री. रामविलास श्रीराम दरक, रा. खाराकुंवा, गोकुळ अपार्टमेंट, बी-07, छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थींचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 4150/ 2024 | श्री. ज्ञानेश्वर विश्वनाथ ओटे, मु.पो. घाणेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 32 | 4364/ 2024 | श्री. अविनाश विकास वघमारे, रा. सुतगिरणी रोड, बेथल चर्च जवळ, दत्तनगर, श्रीरामपुर ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 33 | 7746/ 2024 | श्रीमती. संगीता मनोज राजपुत रा., रायगड-1, सारा वैभव जटवाडा रोड, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 34 | 7749/ 2024 | श्री.खरे सामाजिक कार्यकरता, फ्लॅट नबंर 02, मनाली अपार्टे मेंट, इंदिरानगर ता. जि. नाशिक | ज.मा.अ. तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 35 | 8324/ 2024 | श्री. साबळे अरुण दौलत, मु.पो. ढोरजळगांव शे. ता. शेवगाव जि. अहमदनगर | तलाठी, तलाठी सजा, गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 36 | 8884/ 2024 | श्री. लक्ष्मीनारायण छोट्टीलाल राठोड, रा. B-9 ठाकुर निवास, गिरीराज हौसिंग सोसायटी कामगार चौक, पुंढरपुर वळदगांव ता. जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 37 | 10924 /2024 | श्री. साबळे अरुण दौलत, मु.पो. ढोरजवळगांव ता. शेवगांव जि. अहिल्यानगर | मंडळ अधिकारी मंडळ कार्यालय, गंगापुर छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 38 | 10930 /2024 | श्री. साबळे अरुण दौलत, मु.पो. ढोरजवळगांव ता. शेवगांव जि. अहिल्यानगर | तलाठी, तलाठी सजा गंगापुर ता.गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | मंडळ अधिकारी मंडळ कार्यालय, गंगापुर छत्रपती संभाजीनगर | |
| 39 | 9600/ 2024 | श्री. विश्वास देविदासराव नवपुते, रा. चिकलठाणा विमानतळ छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा राजणगांव शेणपुरी ता. गुगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 40 | 4019/ 2024 | श्री. महादेव सत्यभान ठोके, मु. कोळीवीडखा पो. थेटगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार(महसुल), तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 5224/ 2024 | श्री. सुरज दादाबा दहिफळे, मु.पो. खडकेश्वर नगर लोणार ता. लोणार जि. बुलढाणा | तलाठी, तलाठी सजा हिरडपुरी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 42 | 6860/ 2024 | श्री. राज भिमराव नाटकर, रा. राहुलनगर कातपुर ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 43 | 7254/ 2024 | श्री. पांडुरंग बापुराव दविदास, मु.पो. बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा बिडकीन ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 44 | 7380/ 2024 | श्री. गणेश भाऊसाहेब बोडखे, मु.पो. प्लॉट नबंर पी-20, राम इंटरप्रायजेस, एम.आय.डी.सी. पैठण एरिया, मुधलवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 45 | 7381/ 2024 | श्री. गणेश भाऊसाहेब बोडखे, मु.पो. प्लॉट नबंर पी-20, राम इंटरप्रायजेस, एम.आय.डी.सी. पैठण एरिया, मुधलवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 46 | 7382/ 2024 | श्री. गणेश भाऊसाहेब बोडखे, मु.पो. प्लॉट नबंर पी-20, राम इंटरप्रायजेस, एम.आय.डी.सी. पैठण एरिया, मुधलवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 47 | 7383/ 2024 | श्री. गणेश भाऊसाहेब बोडखे, मु.पो. प्लॉट नबंर पी-20, राम इंटरप्रायजेस, एम.आय.डी.सी. पैठण एरिया, मुधलवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 48 | 9694/ 2024 | श्री. गणेश भाऊसाहेब बोडखे, मु.पो. प्लॉट नबंर पी-20, राम एंटरप्रायजेस, एम.आय.डी.सी. पैठण एरिया मुधलवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 49 | 7256/ 2024 | श्री. राहुल कुंडलिक पगारे, रा. जायकवाडी उत्तर ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 50 | 9595/ 2024 | श्री.रायभान किसन उघडे, रा 140, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गारोड, छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 51 | 4450/ 2024 | श्री. सागर चंद्रकांत जाधव, रा. स्माशान मारोती रोड कैलास नगर, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 52 | 5513/ 2024 | श्री. मुकोद खॉन महेमुद खॉन पठाण, रा. समर्थ नगर कन्नड ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 53 | 8827/ 2024 | श्री. अशोक अर्जुन निकम, रा. समर्थ नगर कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार( पुरवठा), तहसिल कार्यालय कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर छत्रपती संभाजीनगर | |
| 54 | 9582/ 2024 | श्री. श्रीकांत पांडुरंग डोळस, रा. घर क्र. 103, ओम रेसीडेन्सी, तुषार पार्क, गुडविल स्केअर च्या मागे धानोरा, पुणे-411015 | ज.मा.अ. तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 55 | 9914/ 2024 | श्री. संतोष भावगिर गिरी, रा. अनुराधा पार्क कन्नड ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-01), तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 56 | 9916/ 2024 | श्री. संतोष भावगिर गिरी, रा. अनुराधा पार्क कन्नड ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-01), तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 57 | 11126 /2024 | श्री. पटेल मुकीम महेबुब, रा. प्लॉट नबंर 03, गल्ली नंबर 29, न्यु बायजीपुरा (इंदिरानगर), छत्रपती संभाजीनगर | तलाठी तलाठी सजा, शेलागाव (जहागीर), ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 58 | 5351/ 2024 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका, रा.भारुका मेडीकल मेन रोड, कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 59 | 5630/ 2024 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका, रा. भारुका मेडीकल मेन रोड, कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 60 | 8752/ 2024 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका,रा. भारुका मेडीकल मेन रोड, कन्नड ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 61 | 9907/2024 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका, रा.भारुका मेडीकल मेन रोड कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कायालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 62 | 9908/2024 | श्री. प्रदिप बाबुलाल भारुका, रा.भारुका मेडीकल मेन रोड कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कायालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 63 | 6257/2024 | श्री. शिवनाथ पोपट मतसागर, रा. जरुळ ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 64 | 8273/2024 | श्री. जाधव सुभाष नारयणराव, रा. गट क्र. 92, प्लॉट नंबर 02, विद्यानगर, टेलिफोन ढक्सचेज जवळ, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर | |
| 65 | 9396/2024 | श्री. संतोष भावगिर गिरी, रा. अनुराधा पार्क कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 66 | 10395/2024 | श्री. अरुण दामोधर निकम, रा. बि-01, बंगला तिरुपती विहार कॉलनी, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा शिवुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 67 | 10396/2024 | श्री. अरुण दामोधर निकम, रा. बि-01, बंगला तिरुपती विहार कॉलनी, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा शिवुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 68 | 10397/2024 | श्री. अरुण दामोधर निकम, रा. बि-01, बंगला तिरुपती विहार कॉलनी, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल), तहसिल कार्यालय वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 69 | 10402/2024 | श्री. ज्ञानदेव हरीचंद्र वैद्य, व्दारा. महाले निवास पिंगळे गल्ली मखमलाबाद, नाशिक | ज.मा.अ. तहसिल कार्यालय वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 70 | 5507/2024 | श्री. गौतम एस.बनकर, रा. सहस्त्रबुध्दे ले-आऊट जुना उमरसरा ता. जि. यवतमाळ | नायब तहसिलदार (महसुल), तहसिल कार्यालय सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 71 | 1124/2024 | श्री. सिद्धोधन अशोक गंगावणे, रा. घाटी गौतम नगर, प्रगती कॉलनी, घर नंबर 1/12/70, छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा तिसगाव/काचनवाडी, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | अपर तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर | |
| 72 | 5208/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नंबर 14, आरिफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल), तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 73 | 8506/2024 | श्री. सय्यद नदीम अली सय्यद हमीद अली, रा. मिल कार्नर, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 74 | 8616/2024 | श्री. शिवाजी तुकाराम जगताप, रा. मुकुंदवाडी गांव एन-02, सिडको, छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, अप्पर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | अपर तहसिलदार, अप्पर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 75 | 10217/2024 | श्री. जादि मिर फकर अली मीर जफर अली, रा. लेबर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | तलाठी, तलाठी सजा छत्रपती संभाजीनगर | अपर तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 76 | 10475/2024 | श्री. खालेक महेमुद कुरेशी, रा. राज गल्ली मेन रोड गेवराई ता. गेवराई जि. बीड | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 77 | 10476/2024 | श्री. खालेक महेमुद कुरेशी, रा. राज गल्ली मेन रोड गेवराई ता. गेवराई जि. बीड | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 78 | 10477/2024 | श्री. खालेक महेमुद कुरेशी, रा. राज गल्ली मेन रोड गेवराई ता. गेवराई जि. बीड | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 79 | 10756/2024 | श्री. देविदास हरी चव्हाण, रा. कचनेर तांडा क्र. 05, ता.जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 80 | 11036/2024 | श्री. कारभारी माणिकराव गाडेकर, रा. LIG/66, पारिजातनगर म्हाडा कॉलनी, तिसगाव, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. अपर तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर | अपर तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 81 | 8146/2024 | श्री. यशपाल प्रकाश कदम, रा. गट नबंर 68, आरएच-23, साईबन सोसयटी, वडगांव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार, (पुरवठा ग्रामीण), तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार (ग्रामीण), तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 82 | 2307/2024 | श्री. निकाळजे संजय जयवंत, रा. जेतवन बुध्द विहार मागे जयभिमनगर घाटी छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. अन्न धान्य वितरण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर | ज.अ.अ. अन्न धान्य वितरण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर | |
| 83 | 10226/2024 | श्री. गुलाब केशरचंद कासलीवाल, रा. बिल्डिंग नं.ए, फ्लॉट नंबर 701, सर्वे नबंर 28/02, यश फ्लोरोसीया सोसायटी, पुण्यधाम आश्रम रोड, कोंडा पुणे-49 | ज.मा.अ. अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | ज.अ.अ. अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 84 | 10960/2024 | श्री. बादशाह खान हिमायु खान, रा. एस.आर.टी. 70, लेबर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | अव्वल कारकुन, अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | अन्न धान्य वितरण अधिकारी, अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 85 | 10734/2024 | श्री. शेख शाहिबाज आयाज, रा. मनेरोड, संगमनेर ता. संगमनेर, जि. अहमदनगर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परक्षेत्र छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर | |
| 86 | 10735/2024 | श्री. शेख शाहिबाज आयाज, रा. मनेरोड, संगमनेर ता. संगमनेर, जि. अहमदनगर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परक्षेत्र छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर | |
| 87 | 747/2024 | श्री. अंबादास राजाराम तळणकर, रा. एन-11, सी-4, 1/2, गजानन नगर हडको, छत्रपती संभाजीनगर | मुख्यलेखापाल, सामाजिक वनिकरण विभाग, प्रशासकीय इमारत उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण कार्यालय, प्रशासकीय इमारत, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 88 | 748/2 2024 | श्री. अंबादास राजाराम तळणकर, रा. एन-11, सी-4, 1/2, गजानन नगर हडको, छत्रपती संभाजीनगर | मुख्यलेखापाल, सामाजिक वनिकरण विभाग, प्रशासकीय इमारत उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण कार्यालय, प्रशासकीय इमारत, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 89 | 749/2024 | श्री. अंबादास राजाराम तळणकर, रा. एन-11, सी-4, 1/2, गजानन नगर हडको, छत्रपती संभाजीनगर | मुख्यलेखापाल, सामाजिक वनिकरण विभाग, प्रशासकीय इमारत उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण कार्यालय, प्रशासकीय इमारत, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 90 | 822/2024 | श्री. चरणसिंग हारसिंग गुसिंगे, मु.पो. शेवगा व्हाया. शेन्द्रा एम.आय.डी.सी. ता. जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरक्षेत्र, एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वनि), एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 03.09.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 91 | 823/2024 | श्री. चरणसिंग हारसिंग गुसिंगे, मु.पो. शेवगा व्हाया. शेन्द्रा एम.आय.डी.सी. ता. जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरक्षेत्र, एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वनि), एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 92 | 824/2024 | श्री. चरणसिंग हारसिंग गुसिंगे, मु.पो. शेवगा व्हाया. शेन्द्रा एम.आय.डी.सी. ता. जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरक्षेत्र, एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वनि), एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 93 | 826/2024 | श्री. चरणसिंग हारसिंग गुसिंगे, मु.पो. शेवगा व्हाया. शेन्द्रा एम.आय.डी.सी. ता. जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरक्षेत्र, एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वनि), एस.एस. सी बोर्डा समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 94 | 845/2024 | श्री. मनोज बबनराव कापुरे, व्दारा. ए.बी. जाधव, प्लॉट नबंर 26/1, सर्वे नबंर 191/2, कृष्णा मंगल कार्यालयाच्या जवळ, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वन्यजीवरक्षक गौताळा औटमघाट अभयारण्य कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 95 | 1011/2024 | श्री. भुषण दौलतराव मोरे, रा. 307, दौलत भवन राहुल नगर, परभणी | वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण विभाग, वनभवन पहिला मजला, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | कार्यालय अधिक्षक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, वनभवन पहिला मजला, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 96 | 4533/2024 | श्री. मिलिंद दगडु मकासरे, रा. मिलिंदनगर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी परिक्षेत्र खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वनी), वनभवन उस्मानपुरा, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर | |
| 97 | 4938/2024 | श्री. कैलास मनाजी बनकर, मु. म्हैसमाळ ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | उप वनसंरक्षक, छत्रपती संभाजीनगर वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 98 | 6410/2024 | श्री. मंगेश अंबादास सनान्से, रा. जटवाडा रोड, हरिओम नगर छत्रपती संभाजीनगर | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), वन विभाग, कार्यालय छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वनिकरण), वन विभाग, छत्रपती संभाजीनगर | |
| 99 | 8503/2024 | श्री. सोमनाथ लक्ष्मणराव पवार, रा. डवाळा ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर | लागवड अधिकारी, समाजिक वनिकरण परिक्षेत्र वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 100 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४११५/२०२४
बोर्ड क्र.१७

श्री.केशव रामा बनकर,
रा.गोळेगाव खु., ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा,
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०४.२०२३ | १.माझे दि.०५.०७.२०२२ चे अर्ज, २. मा.उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांचे जा.क्र.२०२२/जमाबंदी/कावि, दि.३०.०६.२०२२, ३. मा.उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांचे जा.क्र.२०२२/जमाबंदी/कावि-१६, दि.०२.०२.२०२३ आपले कार्यालयास दाखल झाल्याचे नंतर करण्यात आलेली उचित कार्यवाहीचे नकला मिळणे, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी** आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12052 दिनांक : 23/9/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७४८/२०२४

श्री.अंबादास राजाराम तळणकर, अपिलार्थी
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधीक्षक,
उपवनसंरक्षक (प्रा), वन विभाग, वनभवन, एस.एस.सी.बोर्ड समोर, रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
वन विभाग, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक श्री.ज.रा.तिपाले उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८८ | ०६.०९.२०२३ | उपवनसंरक्षक वनविभाग औरंगाबाद यांची कार्यालयीन रोकडवही (कॅश बुक) ची माहिती छायांकित प्रमाणित प्रतीत द्यावी, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती परिपूर्ण स्वरुपात मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी केवळ २१ पृष्ठांची माहिती दिलेली असुन सदर माहिती अपूर्ण आहे आणि सदर माहिती साक्षांकित करुन दिलेली नाही. उर्वरित जी माहिती दिलेली नाही त्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जी माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही ती सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली काही माहिती वनपरिक्षेत्र कार्यालयाशी संबंधित आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली

उर्वरित माहिती कार्यालयाच्या लेखा शाखेशी संबंधित असल्यामुळे अशी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधित लेखापाल यांचे कलम ५ (४) नुसार दि.०८.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सहाय्य घेण्यात आलेले आहे. संबंधित लेखा शाखेने दि.०६.१०.२०२३ रोजी सादर केलेली माहिती दि.०६.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या उपर अपिलार्थी यांच्या आज रोजीच्या आयोगासमोरील युक्तिवादानुसार आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपवनसंरक्षक (प्रा), वन विभाग, वनभवन, एस.एस.सी.बोर्ड समोर, रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती साक्षांकित करुन अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक वनसंरक्षक (वनीकरण), वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२०१४ दिनांक : 23/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७४९/२०२४

श्री.अंबादास राजाराम तळणकर,
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यलेखापाल,
विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक-१,
विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्यलेखापाल, श्री.शे.अकबर शे.फरिद व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती एस.बी.फुले उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८९ | २०.०९.२०२३ | आपल्या कार्यालयातील एमआरईजीएस योजनेची रोकडवही वगळून इतर सर्व उपलब्ध असलेल्या रोकडवहीची माहिती अवलोकनार्थ उपलब्ध करुन द्यावी, आवश्यक असलेली माहिती अवलोकनानंतर तात्काळ नियमानुसार शुल्क भरुन घेण्यात येईल, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. माहिती अर्जानुसार माहिती अवलोकनास्तव मागणी करुन अवलोकनानंतर आवश्यक माहिती शुल्क भरुन घेण्यात येईल, असे नमूद केलेले आहे. तथापि माहिती अर्जात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अवलोकनासाठी दिनांक कळविलेला नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळाली नसल्यामुळे व सदर

माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. सदर मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यलेखापाल, विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. सहायक वनसंरक्षक-१, विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

सत्यमेव जयते

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12015 दिनांक : 23/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८२२ ते ८२४ व ८२६/२०२४ (०४)**

श्री.चरणसिंग हारसिंग गुसिंगे, — अपिलार्थी
रा.शेवगा व्हाया शेंद्रा एमआयडीसी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र कार्यालय, एसएससी बोर्ड समोर, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
एसएससी बोर्ड समोर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.सागर बा.कुटे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती आ.ए. चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९० | १७.१०.२०२३ | आपल्या कार्यालयात वन्यप्राणी हारिणी, रानडुक्कर, वनगाय इत्यादी प्राण्यांनी केलेल्या पीक नुकसान सदर पीक पाहणीवर झालेला एकूण खर्च व त्याची बिले देण्यात यावी, दि.१०.१०.२०१३ ते दि.१०.१०.२०२३, |
| ९१ | १७.१०.२०२३ | आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी रुजू होताना दिलेले दस्ताऐवज हजेरी बुक अहवालाची प्रमाणित प्रत देण्यात यावी, दि.०१.०१.२००० ते दि.०१.०१.२०२३, |
| ९२ | १७.१०.२०२३ | आपल्या कार्यालयात शासनाकडुन आलेला वन्यजीव प्राणी हरिण, डुक्कर, वनगाय यांनी केलेल्या पीक नुकसानासाठी आलेला एकूण निधी व त्याचा विनियोग याची सविस्तर माहिती देऊन सदर लाभ देण्याचे निकष देण्यात यावे, दि.०१.०१.२०१५ ते दि.३०.०४.२०२३, |

| | | |
|---|---|---|
| १३ | १७.१०.२०२३ | आपल्या कार्यालयात वन्यप्राण्यांनी नुकसान केल्याबद्दल भरपाईसाठी शेतकऱ्याने केलेला अर्ज त्यावर आपण केलेली कार्यवाही, सदर कार्यवाही करण्याचे निकष देण्यात यावे, दि.३०.०४.२०१३ ते दि.३०.०४.२०१३, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन मागणी केलेली माहिती त्रयस्थांशी संबंधित असल्यामुळे मागणी केलेली माहिती कलम ८ (१) (त्र) नुसार नाकारण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक, मोठ्या कालावधीची व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12016 दिनांक : 23/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०११/२०२४**
**बोर्ड क्र.९५**

श्री.भुषण दौलतराव मोरे,
रा.३०७, दौलत भवन, राहुल नगर, परभणी ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनक्षेत्रपाल, : उत्तरवादी क्र.१
सामाजिक वनीकरण विभाग, वनभवन, पहिला मजला, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक, : उत्तरवादी क्र.२
सामाजिक वनीकरण विभाग, वनभवन, पहिला मजला, चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, श्री.सचिन सुधाकरराव पवार उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.११.२०२३ | आपल्या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.कक्ष-५/लले/तक्रार/१४९/२०२३-२४, दि.२६.०५.२०२३ संदर्भात माहिती मिळणे, दि.२६.०५.२०२३ ते दि.०७.११.२०२३,<br>१. सदरील पत्रानुसार नांदेड, औरंगाबाद, बीड, लातूर, जालना, उस्मानाबाद कार्यवाही केलेली अहवालाच्या प्रती मिळण्यात याव्यात,<br>२. सदरील प्रकरणी अहवाल पाहुन आपल्या स्तरावरुन दोषीवर कारवाई झाली असल्यास त्याच्याही प्रती मिळणे व अर्जदारास पाठविलेल्या पत्राच्याही प्रती मिळणे, |

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती

उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१५.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असुन उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. म्हणून विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12017 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५३३/२०२४**
**बोर्ड क्र.९६**

श्री.मिलिंद दगडु मकासरे, अपिलार्थी
रा.मिलिंदनगर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
वनभवन, उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.एन.एस. देशमुख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती आ. ए. चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.११.२०२३ | दि.०१.०१.२०२० ते माहिती मिळेपर्यंत, १.आपल्या कार्यालयामार्फत झालेल्या एकूण कामाची यादी, २. सर्व कामाचे अंदाजपत्रक, ३. काम करणाऱ्या मजुराचे जॉबकार्ड, ४. अंदाजपत्रकाला दर मजुरीची यादी, ५. मजुराचे नाव व पत्ता, ६. मजुराचे नावावर काढलेले पेमेंट (कॅशबुक) व्हावचर, ७. प्रत्येक कामाचे मोजमाप पुस्तिका, ८. सर्व मजुराची बँक खात्यात पेमेंट टाकलेली यादी, ९. काम पूर्णत्वाचा दाखला, १०. ज्या गटात कामे झाली त्या जागेचा ७/१२ उतारा इ. कागदपत्राच्या अवलोकन दरम्यान साक्षांकित प्रती मिळाव्या, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध

संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने असे नमूद करण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12018 दिनांक :- 23/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९३८/२०२४**
**बोर्ड क्र.९७**

श्री.कैलास मनाजी बनकर, — अपिलार्थी
रा.म्हैसमाळ, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
वनभवन, उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.एन.एम. देशमुख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती आ.ए. चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०५.२०२३ | संयुक्त वनव्यवस्थापन समिती म्हैसमाळ यांचे प्रवेशकर, वाहनतळ व व्यावसायिक दुकान, कोरोग्राफी, घोडस्वारी यांचेविषयी,<br>वरील विषयी विनंती की मला वरील समितीचा सन २०२१ ते २०२३ पर्यंतचे ऑडिट रिपोर्ट व जमा रक्कम झालेल्या खर्चाचा संपूर्ण तपशिल, बँक स्टेटमेंटसह व समितीला आलेला सरकारी निधी याचा संपूर्ण तपशिल तसेच समितीच्या वरील कालावधीतील मासिक सभेचा वृत्तांत इ. आवश्यकता आहे ती द्यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.१४.०८.२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन, माहिती मिळाली व

समाधान झाले असल्याबाबत पोच दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशुन लिहिलेले दि.१४.०८.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असल्याचे व समाधान झाले असल्याचे नमूद करुन दि.३१.०५.२०२३ रोजीचा माहिती अर्ज निकाली काढण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१४.०८.२०२५ रोजी लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12019 दिनांक : 23/10/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४८५३/२०२४
बोर्ड क्र.०१

श्री.विरेंद्र सिताराम वाघ,
रा.खुलताबाद, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०९.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.स्वरुप कंकाळ उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.१०.२०२३ | सजा गदाना तलाठी श्री.शिवाजी साळुंके यांचे मत्ता व दायित्व विवरण पत्र-१, २ व ३ मिळणेबाबत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०७.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण२०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, दि.१७.१०.२०१४ नुसार उपलब्ध करुन देता नसल्याचे अपिलार्थी यांना कळवून माहिती अर्ज निकाली काढलेला आहे.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. सदर मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नाही. तसेच अशी माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार उघड करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.:- 12020 दिनांक :- 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५२०८/२०२४
बोर्ड क्र.७२

श्री.सय्यद रफिक सय्यद लाल,
रा.हिमायतनगर, प्लॉट नं.१४, आरेफ कॉलनी,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१६.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०७.२०२३ | श्री.राजेंद्र इद्रकांत भांड हे तलाठी सजा कार्यालय चिकलठाणा औरंगाबाद येथे तलाठी म्हणून कार्यालयात आहे याची खालीलप्रमाणे माहिती देणे,<br>अ. श्री.राजेंद्र इद्रकांत भांड यांचे सेवेत नियुक्ती संदर्भात प्रसिध्द झालेल्या वर्तमानपत्रातील जाहिरातीतील सत्यप्रत देण्यात यावी,<br>ब. श्री.राजेंद्र इद्रकांत भांड यांचे जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत देण्यात यावी, तसेच जात पडताळणी झाली असल्यास त्याची सत्यप्रत देण्यात यावी,<br>क. श्री.राजेंद्र इद्रकांत भांड यांनी नियुक्तीच्या वेळी जे जे कागदपत्र दाखल केले होते त्या सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. यानंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. प्रसंगावशात, माहितीची मागणी करण्यामागे अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12021 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०७३४ व १०७३५/२०२४ (०२)

श्री.शेख शहिबाज आयाज,
रा.मेन रोड, संगमनेर, ता.संगमनेर, जि.आहिल्यानगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक,
वन विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.सागर बाजीराव कुटे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती आ.ए.चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८५ | २७.०८.२०२४ | आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालयामार्फत राज्य योजने अंतर्गत प्राप्त अनुदानातुन झालेल्या सर्व वनविषयक कामाचे राज्य योजना कॅशबुकच्या सत्य छायांकित प्रती द्यावेत, सन २०२३ ते आजपावेतो, |
| ८६ | २७.०८.२०२४ | आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत येणारे सर्व संयुक्त व्यवस्थापन समितीच्या मार्फत केलेल्या वनविषयक कामाचे कामनिहाय समितीनिहाय कॅशबुकच्या सत्य छायांकित प्रती द्यावेत, सन २०२३ ते आजपावेतो, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. सदर मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त वनपाल यांचेशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे हस्तांतरित केलेला आहे. संबंधित वनपाल यांचेकडुन माहिती प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना दि.२६.११.२०२४

रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. संबंधित वनपाल यांच्याकडुन माहिती अप्राप्त असल्याने अशी माहिती अपिलार्थीस देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जोडपत्र अ ची कोणतेही दखल घेतलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12022 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६४१०/२०२४**
**बोर्ड क्र.९८**

श्री.मंगेश अंबादास सनान्से, अपिलार्थी
रा.जटवाडा रोड, हरिओम नगर, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधीक्षक,
उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय, वन विभाग,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
वनभवन, उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, श्री.ज.रा.तिपाले व जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), जालना (उत्तर) उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०३.२०२४ | वनपरिक्षेत्र जालना उत्तर व दक्षिण वनपरिक्षेत्रातील जिल्हा वार्षिक योजनेतील चालु असलेल्या २०२४ च्या मंजुर झालेल्या विविध कामाची यादी व माहिती मिळण्याबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना उत्तर (प्रा) या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे दि.२६.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), जालना उत्तर यांचेकडे वर्ग केलेला आहे. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), जालना उत्तर यांना अवगत केले असुन ते आज रोजीच्या सुनावणीकरिता उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), जालना उत्तर यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये त्यांना व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन त्यांनी कार्यालयाकडे माहिती प्राप्त करुन घेणेबाबत व्यक्तिश: प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०६.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, उपलब्ध माहितीचे अवलोकन करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक / वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), जालना उत्तर यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीचे शुल्क ज्ञात करुन घेणे / माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. मात्र असे उत्तरदायित्व या प्रकरणी अपिलार्थी यांनी पार पाडले असल्याचे दिसुन येत नाही. तसेच आज रोजीच्या आयोगासमोरील सुनावणीकरिता देखील अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये व आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12023 दिनांक :- 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८५०३/२०२४
बोर्ड क्र.१९

श्री.सोमनाथ लक्ष्मणराव पवार,
रा.डवाळा, ता.वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनक्षेत्रपाल,
सामाजिक वनीकरण परिक्षेत्र वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक-१,
विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत, उस्मानापुरा, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, श्री.सु.एच.चिकटे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक-१, श्रीमती एम.बी.फुले उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०६.२०२४ | वैजापूर कार्यालयातील सामाजिक वनीकरण मधील रोजंदारी तत्वावरील कार्यरत असलेले वनमजुर, बारमाही वन मजुराची नावासह यादी साक्षांकित प्रतीत मिळणेबाबत, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रथमत: दि.०३.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, दि.०८.०७.२०२४ रोजी कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी या पत्राच्या अनुषंगाने उपस्थित राहुन अवलोकन करणेबाबत प्रतिसाद दिलेले नाही. म्हणून दि.२५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दि.०६, ०७ व ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना पुन:श्च सूचित

केलेले आहे. तथापि यावेळी देखील अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत नाही. तसेच आज रोजीच्या आयोगासमोरील सुनावणीकरिता देखील अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये व आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12024 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८४५/२०२४
बोर्ड क्र.९४

श्री.मनोज बबनराव कापुरे, अपिलार्थी
व्दारा-ए.बी.जाधव, प्लॉट नंबर २६/१, सर्वे नंबर २६/१, सर्वे नंबर १९१/२, कृष्णा मंगल कार्यालयाच्या जवळ, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक वन्यजीवरक्षक, गौताळा ओटमघाट अभयारण्य, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (वन्यजीव), कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक वन्यजीवरक्षक, श्री.एस.एन.शिंदे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०९.२०२३ | दि.०१.०६.२०२२ पासुन ते माहिती मिळण्याच्या तारखेपर्यंत आपल्या कार्यालयाच्या वतीने शासकीय वाहनाच्या डिझेल, तेल व इतर देखभाल करण्यासाठी झालेल्या खर्चाच्या पावत्या व त्याची ३२ नं. प्रमाणके तसेच कार्यालयीन खर्चासाठी आलेल्या अनुदानाबाबत केलेल्या खर्चाच्या सर्व पावत्या व ३२ नं. प्रमाणके,<br>- वनपाल गौताळा यांनी उपरोक्त कालावधीमध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) कन्नड यांच्या कार्यालयास मंजुरीसाठी सादर केलेले सर्व ३२ नं. प्रमाणके,<br>- शासकीय वाहनाचे लॉगबुकच्या साक्षांकित प्रती, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी,

आठ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात असे नमूद करण्यात येत आहे की, कार्यालयात शासकीय वाहन उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती निरंक आहे. तथापि माहिती निरंक असल्याची बाब अपिलार्थीस कळविण्याचे अनावधानाने राहुन गेलेले आहे. सदर बाब आयोगाकडील निर्देशानुसार अपिलार्थीस वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कळविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती निरंक असल्याचे दिसुन येत आहे. तथापि माहिती निरंक असल्याचे बाब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक वन्यजीवरक्षक, गौताळा औटमघाट अभयारण्य, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती / वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक वनसंरक्षक (वन्यजीव), कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12025 दिनांक : 23/9/2025

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९३८७/२०२४
बोर्ड क्र.२५

श्री.ई.टी.काळे,
रा.खुपटा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (संगायो),
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२२.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०७.२०२४ | खाली दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळणे बाबत,<br>१.संजय गांधी निराधार योजना, २. श्रावणबाळ योजना, ३. वृध्दपकाळ योजना, ४. इंदिरा गांधी योजना, ५. इतर योजना, खुपटा गावाची यादी, |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी

एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12026 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २३६/२०२४
बोर्ड क्र.२६

श्री.सुभाष परभतराव खमाट,
रा.उमरावती, पो.आळंद, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार, : उत्तरवादी क्र.१
तहसिल कार्यालय, फुलंब्री , जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, उत्तरवादी क्र.२
तहसिल कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.संजीव किशनराव राऊत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०९.२०२३ | पोलीस स्टेशन वडोद बाजार गैर अर्जदार अमोल भाऊसाहेब खमाट यांनी दि.२४.०७.२०२३ ते आजपर्यंत दाखल केलेल्या अर्जाची संपूर्ण माहिती, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता

अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12027 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४४४३/२०२४
बोर्ड क्र.२७

श्री.नरेंद्र उत्तमराव देशमुख,
रा.वारेगाव, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, फुलंब्री , जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.संजीव किशनराव राऊत उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०६.२०२३ | गाव वारेगाव मधील गट नं.३०५ व त्या बाजूचा गट यातील मुरुम उचलण्याचा परवाना दिला आहे का, कोणाला दिला असेल तर त्याचे नाव, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12028 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६२४९/२०२४
बोर्ड क्र.२८

श्री.उमेश सांडु कुंटे, अपिलार्थी
रा.बोधेगाव बु., ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (पुरवठा),
तहसिल कार्यालय, फुलंब्री , जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२४ | माझे रेशन कार्ड बंद झाले, माझ्या गावात किती लोकांचे बंद केले, बंद करण्याचे कारण, बंद करण्याचे निकष काय आहे, याची माहिती, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २

(च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12029 दिनांक :- 23/9/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७७६२/२०२४
बोर्ड क्र.२९

श्री.बाळासाहेब विठ्ठल कुंटे,
रा.बोधेगाव बु., ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (पुरवठा),
तहसिल कार्यालय, फुलंब्री , जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०३.२०२४ | रेशन कार्डवरचे रेशन कशाकरिता बंद करण्यात आले, माझे गावात किती लोकांचे बंद केले आहे, कार्डवरचे रेशन बंद करण्याचे निकष काय लावण्यात आले, निकषची माहिती मिळावी, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 12030 दिनांक :- 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११०१९/२०२४
बोर्ड क्र.३०

श्री.रामविलास श्रीराम दरक,
रा.खाराकुँवा, गोकुळ अपार्टमेंट, बी-७, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, फुलंब्री , जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.संजीव किशनराव राऊत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०९.२०२४ | आपल्या कार्यालयात दि.०६.०१.२०२३ रोजी दोघा भावांचे सामाईक शेतजमिनीचे वाटणी पत्राबाबत अर्जाची माहिती ५ मुद्यांवर. |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. वाटणीपत्राकरिता तहसिल कार्यालयात अर्ज सादर केलेला असुन अद्याप त्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर करण्यात आलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी शेतजमिनीचे वाटणीकरिता अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.३०.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, बहिणीचे रजिस्टर हक्कसोड सादर करण्याचे व रजिस्टर हक्कसोड सादर केल्यानंतर प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या बहिणीचे

रजिस्टर हक्कसोड सादर केले नसल्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेली वाटणीबाबतची कार्यवाही अनुसरण्यात आलेली नाही. या नंतर अपिलार्थी यांनी प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे त्यांनी दि.०६.०१.२०२३ रोजी सादर केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात उपलब्ध असलेली माहिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन हस्तगत करावी, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती म्हणजे दि.३०.०७.२०२४ रोजीचे पत्र अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. मात्र अपिलार्थी यांना त्यांच्या प्रकरणात अभिप्रेत असलेली कार्यवाही अद्याप प्रलंबित असुन त्यासाठी अपिलार्थी ज्यावेळी त्यांच्या बहिणीचे रजिस्टर हक्कसोड कार्यालयात सादर करतील त्यावेळी त्यांच्या प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्याची कार्यालयाकडुन दक्षता घेण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, वाटणीपत्र करुन देण्यात आलेले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्यांचे संबंधित महसुली प्रकरणात काही कार्यवाहीची अपेक्षा असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात त्यांनी तहसिलदार, फुलंब्री यांनी त्यांच्या दि.३०.०७.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही करणे उचित ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रि २।१६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12031 दिनांक : 23/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४१५०/२०२४**
**बोर्ड क्र.३१**

श्री.ज्ञानेश्वर विश्वनाथ औटे, — अपिलार्थी
रा.घाणेगाव, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२४ | निलेश साहेबराव सोनवणे यांना वाळूज परिसरातील गट नं.२१ मध्ये रस्त्याच्या कामासाठी गौणखनिज चोरी प्रकरणात आपल्या कार्यालयामार्फत पाठवलेली दंडात्मक व कारणे दाखवा नोटीस जा.क्र.२०२३ जमा-२ गौ.ख./कावि-२२, दि.१७.०१.२०२३ या संदर्भात निलेश सोनवणे यांनी नोटीस प्रकरणात केलेल्या खुलाशाची (लेखी) माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात खुलाशाची प्रत उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरण हे अवैध गौण खनिज चोरीशी संबंधित असुन याबाबत संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र तहसिल प्राधिकरणाकडुन सदर प्रकरण गांभिर्याने हाताळण्यात येत नाही. म्हणून माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१४.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, प्रकरणातील संचिकेचे अवलोकन केले असता, सदर संचिकेमध्ये एकुण १ ते ८ पाने असुन सदर संचिकेमध्ये श्री.निलेश साहेबराव सोनवणे यांनी कार्यालयाने दिलेल्या नोटीसचा खुलासा सदर संचिकेस उपलब्ध नसल्यामुळे सदर खुलासा उपलब्ध करुन देता येणार नाही, करिता माहिती अधिकाराचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण स्वरुपाची माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन खुलाशाची प्रत उपलब्ध नसल्याचे मोघमपणे कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती का उपलब्ध नाही याबाबतची वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी कळविलेली नाही. सारांशाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगतपणे हाताळलेला नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगतपणे हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२९.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७ / ७४ /प्र.क्र.१५४ / ०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12032 दिनांक : 23 | 9 | 2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४३६४/२०२४
बोर्ड क्र.३२

श्री.अविनाश विकास वाघमारे, — अपिलार्थी
रा.सुतगिरणी रोड, बेथल चर्च जवळ, दत्तनगर, श्रीरामपूर,
ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना, त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.१२.२०२३ | मौजे हसुल येथील मुरुम उत्खननाबाबतची माहिती उपलब्ध करुन मिळावी, दि.०१.०१.२०२० ते आजपर्यंत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12033 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७७४६/२०२४
बोर्ड क्र.३३

श्रीमती संगिता मनोज राजपुत,
रा.रायगड-१, सारा वैभव, जटवाडा रोड, हर्सुल,
छत्रपती संभाजीनगर
: अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०१.२०२४ | १. मंडळाधिकारी यांनी दि.११.०५.२०२२ रोजी मंजुर केलेला फेर फार क्र.१४१८ कोणत्या शासन निर्णयाच्या आधारे रद्द करण्यात आला त्याच्या छायांकित प्रती,<br>२. कोणत्या परिपत्रकाच्या आधारे रद्द करण्यात आला त्याच्या छायांकित प्रती,<br>३. कोणत्या महसुली नियमानुसार रद्द करण्यात आला त्याच्या छायांकित प्रती, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण आहे. म्हणून माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण

माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (पूर्वी दिलेली माहिती वगळून) अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12035 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७७४९/२०२४
बोर्ड क्र.३४

खरे सा.मा.कार्यकर्ते, — अपिलार्थी
फ्लॅट नं.२, मनाली अपार्टमेंट, इंदिरानगर, ता.जि.नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
| --- | --- |
| २२.०४.२०२४ | सुखदेव ना.लगड, सौ.मिरी सुख, प्रवीण व अमोल उर्फ बाळू लगड यांचे सहूल वस्तीत गंगापूर नेवुरगांव रस्ता २ किमीचे दक्षिणेस स.नं.२०५/४ ल वस्तीत न.प.क्षेत्रात पत्रे घर सन २०१२ मध्ये उभारुन राहतात, घर बेकायदा--- कारवाईचे दस्त मिळावे. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहितीचा अधिनियमातील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ठ होत नाही. त्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२०३५ दिनांक :- २३/९/२०२५

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८३२४/२०२४**
**बोर्ड क्र.३५**

श्री.साबळे अरुण दौलत, — अपिलार्थी
रा.ढोरजळगाव शे., ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
सजा गंगापूर, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
मंडळ अधिकारी,
मंडळ अधिकारी कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०६.२०२४ | गाव गंगापूर येथील जमिन गट नंबर ३०६/१/१ क्षेत्र २ हे १२ आर क्षेत्रावरील हक्कातील फेरफार व इतर हक्कातील फेर फार / खाते क्रमांकाच्या संदर्भात फेरफार नं. १३५७७, १०१३२, १३५८५, १२९६६, ७०४१, ४३५३, २१६१, ४२५४, १२११४, ७७९३, ९०१०, ९०१२, ८०५७, १०८११, ११९४५, ५१५७, ७२०८, ५९७९, ५९८०, ५९३७, ५६८०, २४५६, ५७३७, १०४१०, ५७४८, ५७३९, ६०७६, ७११८, ७०४१, ७८३, ११३८९, ५३५०, ५७५०, ७९७१, ६०७५, ७०४९, ७०१७, ९३२७, ७०९६, ५७७३, ७४६४, ७६४२, १००६०, १०१५३, १०३४२, ११२१७, ३०७०, ५००१, ४३२५, ५८१०, ९२०७, ७३२६, ७४२९, ७४६१, ९७२८, ७६४७, ५८११, ७५३६, ७६०८, ७६९७, ७७२३, ९५९२, १, ११५४३, ९३११, ११३८९, ४२६७, ११४०७, १२०४६, १२९१०, १२९६६, १३०७६, १३५७७, १३५८५ तसेच इतर हक्कातील फेरफार नं.११०९१, १३१०९, १३१५९, १३३८९, १३५७७, फेरफार प्रतीची, फेरफार तयार झालेल्या पुराव्याच्या कागदोपत्राची माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती वेळेत दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12036 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८०७५/२०२४
बोर्ड क्र.०२

श्री.विरेंद्र सिताराम वाघ,
रा.जुनी स्टेट बँकेच्या मागे, खुलताबाद,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१३.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.स्वरुप कंकाळ उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०३.२०२४ | मंडळ अधिकारी वेरुळ श्रीमती भाग्यश्री दुतोंडे यांची जंगम मालमत्ता माहिती, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२८.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण२०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, दि.१७.१०.२०१४ नुसार अनुज्ञेय नसल्याचे माहिती पुरविता येणार नसल्याचे

अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१५.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, मुदतीत आदेश दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. सदर मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नाही. तसेच अशी माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार उघड करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12042 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४४३, २०२५, २०३१, ५७१५ व ५७१६ / २०२४ (०५)

श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली, — अपिलार्थी
रा.माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी, सिल्लोड,
ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०२.२०२४, दि.१८.०३.२०२४ (०२), दि.२७.०५.२०२४ व दि.१८.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.निखील माणिकराव देशमुख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती आशा अ.चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ०५ | ०१.०९.२०२३ | तालुका सिल्लोड मौजे कोटनांद्रा येथील नगर परिषद सिल्लोड मुख्याधिकारी यांचे ५८३० ब्रास वाळू घाट कंत्राट व त्या संबंधी दाखल झालेले तक्रारी विषयी माहिती, |
| ०६ | २१.१२.२०२३ | तहसिल कार्यालयात जवळपास दोन हजार लाभार्थ्यांना शिधापत्रिकेचे वाटप करण्यात आले असुन त्या संदर्भातील संपूर्ण प्रशासकीय माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत, |
| ०७ | ०५.०९.२०२३ | तालुका सिल्लोड मौजे कोटनांद्रा येथील नगर परिषद सिल्लोड मुख्याधिकारी यांचे ५८३० ब्रास वाळू घाट कंत्राट विषयी माहिती, |
| ०८ | २१.१२.२०२३ | विद्यमान तहसिलदार श्री.रमेश जसवंत यांनी कलम ४२ अंतर्गत दिलेल्या सर्व प्रकारच्या अकृषक परवानगीची संपूर्ण शासकीय माहिती मिळणेबाबत, |
| ०९ | २१.१२.२०२३ | अर्जदार बाजीराव किसन मोरे यांचे मौजे शिंदेफळ तालुका सिल्लोड येथील गट नंबर |

| | | |
|---|---|---|
| | | २५९१ कलम ४२ - क अनुसार दिलेल्या अकृषिक परवानगी संपूर्ण संचिका मिळणेबाबत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आज रोजी सुनावणीपूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी म्हणून माझेशी संपर्क करुन संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संपर्क करुन माहिती प्राप्त करुन घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांना संपर्क करुन त्यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांना अवगत करण्यात आलेले असुन त्यास अपिलार्थी यांनी सहमती दर्शविलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे आणि अवलोकनानंतर चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल. या परिस्थितीत अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताही प्रतिसाद दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासित केले असुन त्यास अपिलार्थी यांनी सहमती दर्शविलेली आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे उचित ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद पाचही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12045 दिनांक :- 23/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८८८४/२०२४
बोर्ड क्र.३६

श्री.लक्ष्मीनारायण छोट्टेलाल राठोड,
रा.बी-९, ठाकुर निवास, गिरीराज हौसिंग सोसायटी, कामगार चौक,
पंढरपूर वळदगाव, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०७.२०२४ | १. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे पत्रानुसार उपजिल्हाधिकारी श्री.इंद्रजित कटके यांचे मा.सर्वोच्च न्यायालय याचे आदेशाचे पालन करणेबाबत काढलेले आदेश दि.११.०४.२०१२ मा.विभागीय आयुक्त यांचे पत्र जा.क्र.२०१२/मशाका/भूसुधार/इनाम/कावि४८८, दि.११.०४.२०१२ नुसार झालेले आदिवासी यांचे हस्तांतराचे आपल्या तालुक्यात झालेली कार्यवाहीचे अहवालाचे माहिती,<br>२. फकीरी किशन गांगवे सर्वे नं.१९१ गट नं.३११, ३१२, ३१३ या आदिवासी बाईचे जमिनीचे हस्तांतरण बाबतचे अहवाल मिळणे बाबत, या बाईचे सन २०११ पासुन काय कार्यवाही झाली त्याची माहिती मिळणे,<br>३. उपविभागीय अधिकारी वैजापूर यांचे पत्र क्र.२०२२/अपील/मजमअ/कावि, दि.०८.०४.२०२२ कार्यवाही व माहिती मिळणेबाबत, |

| | ४. तहसिलदार गंगापूर यांचे पत्र जा.क्र.२०२३/जमा-२/कावि दि.२९.०९.२०२३ नुसार झालेली कार्यवाहीचे माहिती मिळणेबाबत, |
|---|---|

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (j) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12037 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०९२४/२०२४
बोर्ड क्र.३७

श्री.साबळे अरुण दौलत,
रा.ढोरजळगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा, — : उत्तरवादी क्र.१
मंडळ अधिकारी,
मंडळ अधिकारी कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.११.२०२४ | गाव गंगापूर येथील जमीन गट नं.३०६/१/१ क्षेत्र २ हेक्टर ९२ आर क्षेत्रावरील हक्कातील फेर फार व इतर हक्कातील फेर फार / खाते क्रमांक या संदर्भात आपल्या कार्यालयातील फेर फार विषयी व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) च्या तरतुदीचे पालन करुन संबंधित दि.१८.०७.२०२४ रोजी ऑनलाईन माहिती अर्ज केला होता, तथापि माझ्या अर्जावर आजपर्यंत कोणतीही समाधानकारक कारवाई करण्यात आलेली नाही, त्याबाबत ०६ मुद्यांवर माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी दि.१८.०७.२०२४ रोजी सादर केलेल्या माहिती अर्जावर समाधानकारक कार्यवाही झाली नसल्यामुळे या अर्जासंदर्भातील माहिती प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे मागितलेली आहे. माहिती व प्रथम अपील अर्जाची

सद्यस्थिती किंवा सदर अर्जावरील कार्यवाहीची माहिती ज्ञात करुन घेण्याकरिता परत माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही. अपिलार्थी यांना त्यांच्या दि.१८.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे रितसर प्रथम अपील दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध असताना त्यांनी परत माहितीचा अर्ज दाखल करुन माहितीची मागणी केलेली आहे. ही बाब किंवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12038 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०९३०/२०२४
बोर्ड क्र.३८

श्री.साबळे अरुण दौलत,
रा.ढोरजळगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम महसूल अधिकारी,
सजा गंगापूर, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी,
मंडळ अधिकारी कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.११.२०२४ | गाव गंगापूर येथील जमीन गट नं.३०६/१/१ क्षेत्र २ हेक्टर ९२ आर क्षेत्रावरील हक्कातील फेर फार व इतर हक्कातील फेर फार / खाते क्रमांक या संदर्भात आपल्या कार्यालयातील फेर फार विषयी व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) च्या तरतुदीचे पालन करुन संबंधित दि.२४.०६.२०२४ रोजी ऑनलाईन माहिती अर्ज केला होता, तथापि माझ्या अर्जावर आजपर्यंत कोणतीही समाधानकारक कारवाई करण्यात आलेली नाही, त्याबाबत ०६ मुद्यांवर माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०२४ रोजी सादर केलेल्या माहिती अर्जावर समाधानकारक कार्यवाही झाली नसल्यामुळे या अर्जासंदर्भातील माहिती प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे मागितलेली आहे. माहिती व प्रथम अपील अर्जाची

सद्यस्थिती किंवा सदर अर्जावरील कार्यवाहीची माहिती ज्ञात करुन घेण्याकरिता परत माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही. अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२४.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे रितसर प्रथम अपील दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध असताना त्यांनी परत माहितीचा अर्ज दाखल करुन माहितीची मागणी केलेली आहे. ही बाब किंवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12039 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९६००/२०२४
बोर्ड क्र.३९

श्री.विश्वास देविदासराव नवपुते,
रा.चिकलठाणा विमानतळ, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम महसूल अधिकारी,
सजा रांजणगाव शेणपुंजी, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मांगितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०७.२०२४ | गट क्र.५ राजणगाव शे.पु. एकूण क्षेत्र ०३ एकर २६ गुंठे शेत जमिनी तहसिलदार गंगापूर एन.ए.४२ ड नक्कल ०७.०८.२०१९ ची नक्कल तलाठी कार्यालय यांच्या उपलब्ध नसताना कोणत्या तलाठी आणि कोणत्या मंडळ अधिकारी यांच्या मान्यतेने व किती लाख रु. घेऊन फेरफार क्र.१६८२ नुसार ७/१२ उताऱ्यावर नोंद घेतली आहे, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, सजा रांजणगाव शेणपुंजी, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, सजा रांजणगाव शेणपुंजी, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी** आयोगासमोर व्यक्तिश: उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२९.०८.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/ ७४ / प्र.क्र.१५४ / ०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12040 दिनांक : 23/9/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४०१९/२०२४
बोर्ड क्र.४०

श्री.महादेव सत्यभान ठोके, — अपिलार्थी
रा.कोळीबोडखा, पो. थेटगाव, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०५.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.१२.२०२३ | माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (क) व (ख) च्या अंमलबजावणीबाबत मी दि.१८.०४.२०२३ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशिल मिळणेबाबत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करताना अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली किंवा कसे याची कोणतीही शहानिशा न करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील अमान्य केलेले आहे. वास्तविक माहिती अर्जानुसार हवी असलेली माहिती अद्यापही मिळालेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12041 दिनांक : 23/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८४९३/२०२४
बोर्ड क्र.०३

श्री.विरेंद्र सिताराम वाघ,
रा.जुनी स्टेट बँकेच्या मागे, खुलताबाद,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम महसूल अधिकारी,
सजा भडजी, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्रीमती एम.आर.कदम व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.सुभाष पांढरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०७.२०२४ | तलाठी, कु.मनिषा कदम, तलाठी, सजा भडजी यांची दैनंदिन नोंदवही (डायरी) ची प्रत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविले असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12043 दिनांक : 23/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८४९७/२०२४**
**बोर्ड क्र.०४**

श्री.विरेंद्र सिताराम वाघ, अपिलार्थी
रा.जुनी स्टेट बँकेच्या मागे, खुलताबाद,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
तलाठी,
सजा भडजी, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्रीमती एम.आर.कदम व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.सुभाष पांढरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०७.२०२४ | कु.मनिषा कदम, तलाठी यांचा भाडेकरार नामा व ग्रामसभेचा ठराव याची माहिती मिळणेबाबत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.१५.०७.२०२४ रोजीच्या पत्रासोबत ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भडजी यांच्याकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात आलेला

आहे. अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज ग्रामपंचायत कार्यालयाकडे वर्ग करण्यात आला असल्याची बाब अपिलार्थी यांना दि.१६.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या वर्ग केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी त्यांच्या दि.२५.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मुख्यालयी राहत असल्याबाबत ग्रामसभेमध्ये ठराव झालेला नाही, असे तलाठी कार्यालयास कळवून ही बाब अपिलार्थी यांना देखील अवगत केलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद किंवा माहिती अर्जाबाबत केलेली कार्यवाही विचारात घेऊन प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती अर्ज माहितीशी संबंधित कार्यालयाकडे वर्ग केला असल्याचे व या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपिलार्थीस, मुख्यालयी राहत असल्याबाबत ग्रामसभेमध्ये ठराव झाला नसल्याचे कळविले असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२०५५ दिनांक : 23/9/2025

प्रत :- जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, भडजी, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४४४ व १४४५/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.१० व ११**

श्री.योगेश भिकन लोथे, — अपिलार्थी
व्दारा-माँ दुर्गा निवास, शास्त्री कॉलनी, सिल्लोड,
ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री.महेश शंकरपेल्ली, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.तुकाराम बनकर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १० | १८.०९.२०२३ | सिल्लोड सर्वे नंबर ९०, ९१ व ९२ मध्ये अब्दुल सत्तार अब्दुल नबी यांना अथवा त्यांच्या परिवारास तसेच नॅशनल एज्युकेशन सोसायटी सिल्लोड संस्थेला अकृषिक परवानगी दिलेली असल्यास त्याची संपूर्ण माहिती मिळणेबाबत, |
| ११ | १८.०९.२०२३ | सर्वे नंबर ९२ मधील नॅशनल एज्युकेशन सोसायटी सिल्लोड यांच्या मालमत्तेशी संबंधित आपल्या कार्यालयातील संपूर्ण कायदेशीर प्रशासकीय माहिती, |

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे विहित शुल्क कळविले असते तर अशा शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरले असते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या

अनुषंगाने कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत कळविलेले आहे. मात्र अपिलार्थी हे दुसऱ्या शहरामध्ये वास्तव्यास असल्यामुळे व त्यांच्या कामाच्या व्यस्ततेमुळे त्यांना माहितीचे अवलोकन करता येणे शक्य झालेले नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे सदर माहिती पुन:श्च अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्यामुळे दि.१७.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी अवलोकनास्तव उपस्थित राहिले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी युक्तिवादात अवगत केलेल्या बाबीच्या पार्श्वभूमिवर अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अवलोकन मागितलेले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12046 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४६८/२०२४
बोर्ड क्र.१२

श्री.अब्दुल रहीम शमशूल हक, — अपिलार्थी
रा.बिलाल नगर, बिलाल मस्जिद रोड, सिल्लोड,
ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
उपविभागीय कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड,
ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "आ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमोर स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12064 दिनांक : 23/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५५१३/२०२४
बोर्ड क्र.५२

श्री.मुकीद खॉन महेमुद खॉन, अपिलार्थी
रा.समर्थ नगर, कन्नड, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२२.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीपकुमार सोनवणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.विद्याचरण कवडकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०२.२०२४ | १. कन्नड येथील तहसिल रोड लगत मातंग समाज राहत असलेल्या जमिनीचा ७/१२ उताराची प्रत देणे, २. सदरील जमिन ही शासकीय मालमत्ता आहे याची माहिती देणे, ३. सदरील जमिन ही खाजगी स्वरुपाची आहे याची माहिती देणे, ४. उपरोक्त जमिनीचा खरेदी विक्रीचा व्यवहार होतो याची माहिती देणे, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहितीसंदर्भात मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती मिळाली असुन उर्वरित माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०६.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती व वस्तुस्थिती अभिलेखात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आली असुन अपिलार्थी यांनी तशी पोच देखील दिलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी मुद्दा क्र.१ ची माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12065 दिनांक : 23/9/2024

सत्यमेव जयते

खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८८२७/२०२४
बोर्ड क्र.५३

श्री.अशोक अर्जुन निकम,
रा.समर्थ नगर, कन्नड, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (पुरवठा),
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०४.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीपकुमार सोनवणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.विद्याचरण कडवकर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०७.२०२४ | दि.०१.०१.२०२३ ते दि.३०.०६.२०२४ पर्यंत PHH शिधा पत्रिका धारकाची यादी, PHH मध्ये समाविष्ठसाठी दाखल केलेले संपूर्ण कागदपत्राची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती व वस्तुस्थिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: प्राप्त करुन घेऊन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली असल्यामुळे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12066 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५३५१, ५६३०, ८७५२, ९९०७ व
९९०८/२०२४ (०५)

बोर्ड क्र.५८ ते ६२

श्री.प्रदिप बाबुलाल भारुका,
रा.भारुका मेडीकल, मेन रोड, कन्नड,
ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०५.२०२४, दि.२४.०५.२०२४, दि.२७.०९.२०२४, दि.११.११.२०२४ व दि.१२.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीपकुमार सोनवणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.विद्याचरण कडवकर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५८ | ०५.०१.२०२४ | माझे पत्र दि.१४.१२.२०२३ नुसार करण्यात आलेल्या आदेशाची संपूर्ण माहिती, |
| ५९ | ०५.०१.२०२४ | आपले पत्र क्र.२०१९/जमा-२/रस्ता/कावि १८ नुसार करण्यात आलेल्या कारवाईची माहिती, |
| ६० | ०५.०७.२०२४ | तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र जा.क्र.२०२३/मशाका/जमीन/ कावि १४७३, दि.०६.०१.२०२३ वरील तसेच सर्वे नंबर २०६/iअ मधील ५ एकर ९ गुंठे जमिनीत जाणे येण्यासाठी रस्त्यास गैरअर्जदारास केलेल्या कारवाईची माहिती मिळणे, |
| ६१ | ३०.०७.२०२४ | मा.दिवाणी व फोजदारी प्र.क्र.Reg.DKS-१८/२०१ मधील आदेश जा.क्र.No१०२६, |

| | | |
|---|---|---|
| | | दि.२५.०१.२०२३ नुसार करण्यात आलेल्या कारवाईची माहिती, |
| ६२ | २५.०७.२०२४ | मी दिलेल्या दि.०९.०७.२०२४ पत्रावरील कारवाईचे संपूर्ण माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. **अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे ते नमूद दिनांकास अवलोकनास्तव उपस्थित न राहिल्यास त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन माहिती अर्ज निकाली काढण्यात यावेत.**

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह प्राप्त व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12070 दिनांक : 23/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ९५८२/२०२४
बोर्ड क्र.५४

श्री.श्रीकांत पांडुरंग डोळस,
रा.घर क्र.१०३, ओम रेसिडेन्सी, तुषार पार्क, गुडविल स्केअरच्या मागे, धानोरा, पुणे — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर, — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीपकुमार सोनवणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.विद्याचरण कडवकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०६.२०२४ | मौजे आलापूर ता.कन्नड शिवारातील येवले वस्ती ते आलापूर गावठाण नकाशात नोंद असलेली वहिवाट बेकायदेशीर अडवलेबाबत आपले कार्यालयाने जीतु भेंडाळे यांचे अर्जावर केलेली संपूर्ण कार्यवाहीची छायांकित / साक्षांकित प्रत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०१.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन संचिकेमध्ये उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थी यांचे समाधान झालेले नाही. कारण अपिलार्थी यांची वहिवाटीबाबत काही तक्रार असुन त्याबाबत त्यांना कार्यवाही अपेक्षित आहे. अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली कार्यवाही प्रगतीपथावर असुन या बाबत नियमानुसार उचित कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद, उपलब्ध करुन दिलेली माहिती विचारात घेऊन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांची माहितीची मागणी करण्यामागे वहिवाटीबाबत जी तक्रार आहे त्याबाबत तहसिलदार म्हणून नियमानुसार उचित कार्यवाहीची बाब व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12067 दिनांक : 23/9/2025

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९९१४ व ९९१६/२०२४ (०२)

श्री.संतोष भावगिर गिरी, — अपिलार्थी
रा.अनुराधा पार्क, कन्नड, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१)
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दिलीपकुमार सोनवणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.विद्याचरण कडवकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५५ | २१.०६.२०२४ | आपल्या कार्यालयाकडे दि.२०.०२.२०२४ आणि दि.३०.०४.२०२४ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती, |
| ५६ | १६.०४.२०२४ | मी दिलेल्या तलाठी सजा भारंबा येथील तलाठी अधिकारी हे माझा नकलेचा अर्ज घेत नसल्यामुळे मी आपल्या कार्यालयाकडे सदर नकला मला मिळण्याकरिता माझ्या ह्या अर्जाची एक प्रत आपल्या अभिलेख कक्षास व दुसरी प्रत तलाठी सजा भारंबा यांना पाठवुन नकलेच्या प्रती मिळण्याकरिता, १. मौजे भारंबा ता.कन्नड येथील शेतजमीन जिचा गट नं. ४७ मधील फेर क्र.२५ व २६ ची फेरसंचिका, २. फेर क्र.०३ व ४३ ची फेरसंचिका सर्वे नंबर १० व १६ प्रमाणे, ३. फेर क्र.२३७ ची फेरसंचिका सर्वे नंबर १० व १६ चे फेर हे सन १९५५ ते १९७५ दरम्यान झालेले आहेत तर गट नं.४७ फे.क्र. ५२ चा फेर १९७१ ते १९७५ झालेला आहे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.५५ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात दि.०३.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.५६ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात नकलेचा अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत दि.१५.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१२.०९.२०२४ व दि.०६.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अप्राप्त असल्यामुळे त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (ज) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12068 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १११२६/२०२४**
**बोर्ड क्र.५७**

श्री.पटेल मुकीम महेबुब, — अपिलार्थी
रा.प्लॉट नं.०३, गल्ली नंबर २९, न्यू बायजीपुरा (इंदिरानगर),
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
सजा शेलगाव (जहागीर), ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.विद्याचरण कडवकर उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.१०.२०२४ | रजिस्टर पोस्ट दि.१५.०१.२०२४, दि.१३.०८.२०२४ व इतर दि.१५.०१.२०२४ रोजीचे पोस्ट केलेले अर्ज दि.१२.०१.२०२४ ची आपण आजपर्यंत अहवाल पाठविला आहे किंवा नाही, नाही पाठविला तर त्याचे कारण सांगावे, किती दिवसात देणे बंधनकारक आहे, आपणास बोजा कमी करण्यास दिलेली आहे, एचडीएफसी बँक व वि.का.का.सो. शेलगाव ग.नं.४१५, ४१७, ४१८ तरी आपण सातबारावरुन बोजा कमी केलेला नाही,--- |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या सात बारावरील बोजा कमी करण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.२९.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये संयुक्तिक उत्तर देण्यात आलेले आहे. सदर उत्तराची प्रत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्यात आलेली असुन त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी आवश्यक कार्यवाही

करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०७.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.११.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस कळविलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती हवी आहे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांना त्यांचेशी संबंधित प्रकरणात काही प्रशासकीय कार्यवाहीची अपेक्षा असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12069 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६२५७/२०२४
बोर्ड क्र.६३

श्री.शिवनाथ पोपट मतसागर,
रा.जरुळ, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.निखील माणिकराव देशमुख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती आशा अे.चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी,

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०२.२०२४ | वैजापूर तालुक्यातील दिव्यांग बांधवाचे संजय गांधी निराधार योजनेची मिटींगचा कालावधी व मागील मिटींग केव्हा झाली व किती फाईल पेंडिंग आहे नावासहीत याची माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीची असल्यामुळे माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.२६.०६.२०२४ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या

माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे चुकीची माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 12091 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८२७३/२०२४
बोर्ड क्र.६४

श्री.जाधव सुभाष नारायणराव, — अपिलार्थी
रा.गट क्र.९२, प्लॉट नंबर ०२, विद्यानगर, टेलिफोन एक्सचेंज जवळ, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.सुरज कुमावत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०५.२०२४ | सावखेड (ख) गावचा गाव नकाशा प्रमाणित प्रत मिळणेबाबत, सावखेड (ख) येथील नकाशात शेतात जाणारे रस्ते असणे आवश्यक आहे, तसेच सदरील नकाशा प्रमाणित करण्यात यावा, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०८.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अर्जात नमूद माहिती शोधण्याचे काम चालू असुन शोध पूर्ण झाल्यानंतर कळविण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तथापि

प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगासमोरील सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती भूमि अभिलेख कार्यालय, वैजापूर या कार्यालयाशी संबंधित आहे. त्यामुळे भूमि अभिलेख कार्यालयाकडे संपर्क साधुन हवी असलेली माहिती हस्तगत करावी, असे अपिलार्थी यांना दि.२८.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कळविण्यात आलेले आहे. सदर पत्र अपिलार्थी यांना मिळाले नसल्यास सदर पत्राची प्रत आज रोजी सोबत आणलेली असुन ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस पुन:श्च देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये हवी असलेली माहिती / वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12072 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९३९६/२०२४
बोर्ड क्र.६५

श्री.संतोष भावगिर गिरी,
रा.अनुराधा पार्क, कन्नड, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२२.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.सुरज कुमावत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०८.२०२४ | १. मौजे साकेगाव ता.वैजापूर येथील शेत जमीन सर्वे नंबर ४१, २०, ०२, ५२, १४९ सन १९५९ ते १९७५ मध्ये झालेल्या फेरच्या प्रती मिळाव्या---<br>२. सन १९७५ ते २०१५ पर्यंत गट नंबर १२२, ३२४, ४८ या गटातील फेर नंबर १८७, ३७८, ५८७, ६१९, ७६१, ७६६, २४४, १९४ या सर्व गटाच्या प्रती मिळाव्या,<br>३. वारस नोंद क्रमांक २३ ची प्रत मिळावी, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती अर्जात

नमूद विषयातील माहिती शोधण्याचे काम सुरु असुन शोध पूर्ण झाल्यानंतर कळविण्यात येईल, असे अपिलार्थी यांना अवगत केलेले आहे. तथापि त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. आता अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अभिलेखे असताना जाणूनबुजुन न देणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यक असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12073 दिनांक : 23/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०३९५ व १०३९६/२०२४ (०२)**

श्री.अरुण दामोधर निकम, — अपिलार्थी
रा.बि-०१ बंगला, तिरुपती विहार कॉलनी, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
सजा शिवुर, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.जितेंद्र अ. कळसकर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६७ | २०.०८.२०२४ | मौजे शिवुर शिवारातील गट नं.१४५ खाते क्रमांक २३१८ मधील जमीन ही श्री.दामु सखाराम निकम यांचे नावावरुन सुधाकर दामु निकम यांचे नावावर कशी व कधी करण्यात आली, ज्या कागदपत्राआधारे करण्यात आली, त्या कागदपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती, फेरफार क्रमांक १७९४, १८५५ |
| ६८ | १९.०८.२०२४ | सन २००१ ते २०२४, मौजे शिवुर शिवारातील गट नं.१४५ खाते क्र.२३१८, ८३४१३, ८३४१४ मधील जमीन सुधाकर दामु निकम यांचे नावावरुन तुषार सुधाकर निकम व उषा सुधाकर निकम यांचे नावावर (मालकीची) कशी करण्यात आली, त्या कागदपत्राची साक्षांकित सत्यप्रत देण्यात यावी, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि सदर माहिती विलंबाने प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या

अनुषंगाने दि.२५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे प्रदान करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्ज सादर केले त्या कालावधीत निवडणूक कामात व्यस्त असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता काही विलंब झालेला आहे. तो क्षमापित करण्यात यावा, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी विलंबाने माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. तथापि आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी विलंबाकरिता नमूद केलेले कारण विचारात घेता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता जाणीवपूर्वक विलंब केला असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12075 दिनांक :- 23/9/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०३९७/२०२४
बोर्ड क्र.६८

श्री.अरुण दामोधर निकम, — अपिलार्थी
रा.बि-०१ बंगला, तिरुपती विहार कॉलनी, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.सुरज कुमावत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०८.२०२४ | मौजे टुणकीचे गाव नमुना नं.१३, ज्यात बळवंता व परसराम यांची अनुक्रमांक १६ वर मोडी लिपीत कुणबी जात (१३०५-फ) ची नोंद आहे, त्याची मूळ मोडी लिपीच्या पानाची व मराठीतील पानाची साक्षांकित सत्यप्रत मिळावी, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती विलंबाने प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी लागला असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याकरिता काही विलंब

झालेला आहे. तो क्षमापित करण्यात यावा, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी विलंबाने माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. तथापि आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी विलंबाकरिता नमूद केलेले कारण विचारात घेता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता जाणीवपूर्वक विलंब केला असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12075 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०४०२/२०२४
बोर्ड क्र.६९

श्री.ज्ञानदेव हरीचंद्र वैद्य,
व्दारा-महाले निवास, पिंगळे गल्ली, मखमलाबाद, नाशिक — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.सुरज कुमावत उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०८.२०२४ | दि.०६.०६.२००१ रोजी मौजे सुराळा ता.वैजापूर जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नं.७३ ला फेर मंजुर करु नये (मनाई अर्ज) दिला होता, सदर अर्जावर दि.०६.०६.२००१ नंतर काय कारवाई झाली त्याचा तपशिल मिळावा, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तलाठी, सजा सुराळा या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०५.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कलम ६ (३) नुसार तलाठी कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. सदर वर्ग केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने संबंधित तलाठी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे संबंधित तलाठी उपलब्ध करुन देतील, ही बाब व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीचे

उत्तर, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज माहितीशी संबंधित कार्यालयाकडे वर्ग केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार मुदतीत हस्तांतरण झाले असल्याचे दिसुन येत नाही. म्हणून अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन अपिलार्थी यांना द्यावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र, अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन (तलाठी सजा सुराळा) कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12096 दिनांक : 23/9/2025

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५५०७/२०२४**
**बोर्ड क्र.७०**

श्री.गौतम एस.बनकर, अपिलार्थी
रा.सहस्त्रबुध्दे ले-आऊट, जुना उमस्सरा, ता.जि.यवतमाळ

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.देशमुख संभाजी शिवाजीराव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०१.२०२४ | १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० पावेतो पर्यंत महसूल प्रकरणाची माहिती, १.वरील विषयान्वये संबंधित कालावधीमध्ये आपल्या कडील महसुल प्रकरणे (नोंदणी, वर्गीकरण, निकालात काढण्याची कार्यपध्दती) नुसार जेवढ्या नोंदवही आपल्याकडे आहे वर्गीकरण केलेल्या आहेत आणि निकालात काढलेल्या आहे अशा प्रकरणाची फाईलची छायांकित प्रत देण्यात यावी, २. स्वयंदर्शक फाईल, टपालाचे वाटप, टपालाचे आवकाची छायांकित प्रत देण्यात यावी, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मोघम स्वरुपाच्या माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, उपलब्ध माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. तथापि

अपिलार्थी यांनी या पत्राच्या अनुषंगाने अवलोकनास्तव उपस्थित राहणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांची बाजु मांडण्याकरिता दोन वेळेस संधी देऊनही अपिलार्थी सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.०६.२०२४ रोजी प्रथम अपिलावर निर्णय पारित करुन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन अवलोकन करण्याची अपिलार्थीस संधी दिलेली आहे. मात्र अपिलार्थी अवलोकनाकरिता तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीकरिता उपस्थित राहिलेले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अवलोकनास्तव बोलावून माहिती देण्याचे टाळले, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणेबाबत सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी अवलोकन करणेबाबत प्रतिसाद दिला असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीकरिता देखील अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये व आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12077 दिनांक : 23/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११२४/२०२४
बोर्ड क्र.७१

श्री.सिध्दीधन अशोक गंगावणे, — अपिलार्थी
रा.घाटी, गौतम नगर, प्रगती कॉलनी, घर नंबर १/१२/७०,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
सजा तिसगाव / कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अपर तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०७.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.१०.२०२३ | मौजे तिसगाव ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नं.१९६ मधील फेरफार क्र.८३१३ व ८३१४,<br>१.संत चोखोबा मागासवर्गीय विट व चूना उत्पादक औद्योगिक सहकारी संस्था या संस्थेस ८८१३ या फेरफारची नोटीस कोणाच्या नावाने कोणत्या तारखेस काढण्यात आली याची छायांकित प्रत,<br>२. सिध्दोधन मागासवर्गीय विट व चुना उत्पादक औद्योगिक सहकारी संस्था या संस्थेस ८३१४ या फेरफारची नोटीस कोणाच्या नावाने कोणत्या तारखेस काढण्यात आली, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीसंदर्भात ७/१२ व फेरफारची प्रत जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.१०.२०२३ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि अनुषंगिक कागदपत्राची माहिती दिलेली नाही. त्यामुळे उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे उर्वरित

माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती प्राप्त न झाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, सजा तिसगाव / कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी उर्वरित माहिती (नोटीसची प्रत), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपर तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12078 दिनांक :- 23/9/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८५०६/२०२४
बोर्ड क्र.७३

श्री.सय्यद नदीम अली सय्यद हमीद अली,
रा.मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०१.२०२४ | मी यापूर्वी आपल्या कार्यालयात दि.१३.०७.२०२३ रोजी अधिकार अभिलेखात नाव नमूद करण्याबाबत दिलेल्या अर्जावर आपल्या कार्यालयाने आजपर्यंत जी काही कार्यवाही केलेली आहे त्या केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्राची छायांकित प्रत देण्यात यावी, तसेच या प्रकरणी काही आदेश / कार्यालयीन पत्र काढले असतील तर त्या आदेश / कार्यालयीन पत्राची छायांकित प्रत देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील

तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12079 दिनांक : 23/9/2025

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८६१६/२०२४**
**बोर्ड क्र.७४**

श्री.शिवाजी तुकाराम जगताप, — अपिलार्थी
रा.मुकुंदवाडी गाव, एन-०२, सिडको, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
अपर तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनांवणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०७.२०२४ | सन २०२३ ते जुले २०२४ मोजे नक्षत्रवाडी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर या तलाठी सजा मध्ये सन २०२३ ते जुले २०२४ पर्यंत आपल्या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या अकृषिक आदेशाच्या गटनिहाय यादी, गटाचे नाव, गट धारकाचे / गट मालकाचे नाव, क्षेत्र, एन.ए. आदेश क्रमांकनिहाय यादी छायांकित प्रती देण्यात यावी, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपर तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२०८० दिनांक : २३/९/२०२

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०२१७/२०२४**
**बोर्ड क्र.७५**

श्री.जद्दी मिर फकर अली मीर जफर अली, — अपिलार्थी
रा.लेबर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
सजा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
अपर तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०७.२०२४ | अ. मौजे हिमायतनगर ता.जि.औरंगाबाद येथील सर्वे नंबर / गट नंबर ३३ मधील जमिनीच्या संदर्भात दि.०१.०१.२०१८ ते आजपर्यंत मी दिलेल्या आक्षेप अर्जाच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात,<br>ब. याच गटातील जमिनीवर दि.०१.०१.२०१८ ते आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी आक्षेप अर्ज आपल्या कार्यालयात दाखल केलेले आहे त्या आक्षेपांच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात,<br>क. अपर तहसिलदार औरंगाबाद यांचे जा.क्र.२०२२/जमा-२/८७६, दि.१२.०८.२०२२ च्या आदेशा नंतर आजपर्यंत याच गटात आपल्या कार्यालयाने जे जे फेर फार घेतले आहेत त्या फेर फारच्या संपूर्ण संचिकेच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध

आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) नुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, सजा छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपर तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२०८१ दिनांक : 23/9/2025

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७५६/२०२४**
**बोर्ड क्र.७९**

श्री.देविदास हरी चव्हाण, — अपिलार्थी
रा.कचनेर तांडा क्र.०५, ता.जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनांवणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०९.२०२४ | मौजे कचनेर तांडा ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नं.१४१ व १५० शेतातील रस्त्यासंदर्भात दि.१९.०८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली तेव्हा शेजारील शेतकऱ्यांना आपल्या कार्यालयाकडुन जो काही पत्र व्यवहार करण्यात आला / नोटीसा देण्यात आल्या त्या संपूर्ण पत्रव्यवहारांचे / नोटीसांच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात, तसेच आम्हाला कळविल्याबद्दल ज्या काही स्वाक्षरी घेण्यात आल्या त्या पत्राच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात, तसेच या संदर्भात दि.२३.०८.२०२४ रोजी तलाठी व मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळी आले होते त्यांनी जो काही अहवाल आपल्या कार्यालयात दाखल केला आहे त्या अहवालाची छायांकित प्रत देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन

होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र२११३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12082 दिनांक :- 23/8/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८१४६/२०२४
बोर्ड क्र.८१

श्री.यशपाल प्रकाश कदम,
रा.गट नंबर ६८, आरएच-२३, साईबन सोसायटी, वडगाव कोल्हाटी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
निरीक्षण अधिकारी,
पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी, श्रीमती उत्कर्षा दत्तात्रय पाटील उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र 'अ' नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०६.२०२४ | धान्य गोदामात ठेवली जाणारी विविध रजिस्टरचा तक्ता, धान्य गोदामात ठेवण्यात येणाऱ्या नोंदवह्या विषयी माहिती मिळणेबाबत, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणेबाबत आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली १४१३ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना दि.१५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन माहिती देण्यात आली अशी पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे व अशी माहिती संकलित / एकत्रित करण्यास काही कालावधी लागला असल्यामुळे अशी माहिती अपिलार्थीस देण्याकरिता विलंब झालेला आहे. कृपया तो क्षमापित करण्यात यावा अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12083 दिनांक : 23/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३०७/२०२४**
**बोर्ड क्र.८२**

श्री.निकाळजे संजय जयवंत,
रा.जेतवन बुध्द विहार मागे, जयभिमनगर, घाटी,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अन्न धान्य वितरण अधिकारी,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनांवणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.११.२०२३ | १. स्वस्त धान्य दुकान क्र.६८ जयभिम नगर घाटी औरंगाबाद अंत्योदय कार्डधारक किती आहेत त्यांचे नाव, पत्ते, मो.नंबर,<br>२. आर.सी. नंबर असलेले अंत्योदय कार्डधारकाच्या घरातील व्यक्तीचे नाव वगळण्यात आलेले आहेत कारण काय, ते पूर्ववत होणार नाहीत काय,<br>३. मोफत धान्य पुरवठा योजने अंतर्गत सर्व कार्ड धारकास प्रत्येक महिन्याला प्रत्येकी रेशन कार्ड किती धान्य वितरीत होते, जानेवारी २०२३ ते २०२३ डिसेंबर या कालावधीमध्ये, किलो द्यायला प्रावधान आहे,<br>४. आपण धान्य वितरित कार्डच्या हिशोबाने की त्या व्यक्तीच्या हिशोबाने, किलोने वितरित करतात, गहू तांदुळ इतर किती किलो दरमहिना कोणत्या दराने,<br>५. शिवभोजन या प्रोजेक्ट विषयी सविस्तर माहिती देणे, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सविस्तर माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन वस्तुस्थितीदर्शक माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रसंगी अशा स्वरुपांच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही, असे निर्णय यापूर्वी पारित करण्यात आलेले आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12084 दिनांक : 23/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०२२६/२०२४
बोर्ड क्र.८३

श्री.गुलाब केशरचंद कासलीवाल, — अपिलार्थी
रा.बिल्डींग नं. ए, फ्लॅट नं.७०१, सर्वे नं.२८/२, यश फ्लोरोसिया सोसायटी, पुण्यधाम आश्रम रोड, कोंडवा, पुणे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — उत्तरवादी क्र.१
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
अन्न धान्य वितरण अधिकारी,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी आयोगाकडील रोजनाम्यावर स्वाक्षरी करुन प्रत्यक्षःत ते आयोगासमोरील सुनावणीकरिता अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०९.२०२४ | सोबत शिधापत्रिका जिचा क्रमांक SP A/O ८०४१५० जोडली असुन त्या अनुषंगाने माहिती हवी आहे, सन २०२२/२०२४,<br>१. वरील क्रमांकाची शिधापत्रिका मिळण्यासाठी कार्यालयात तारेवरची कसरत करावी लागली दिलेल्या शिधापत्रिकाच्या अनुषंगाने स्वस्त धान्य दुकानावर शिधा / गहु, तांदुळ वगैरे मिळत नाही तर शिधापत्रिका देण्याचा शासनाचा काय हेतु याबाबत शासन आदेशासह माहिती द्यावी (दुकान नं.८ ने शिधा देण्यास नकार दिला,<br>२. शिधा पत्रिकाच्या अनुषंगाने कोणकोणत्या योजनाचा लाभ घेता येतो या विषयी शासन आदेशासह माहिती द्यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अन्न धान्य वितरण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२०८५ दिनांक :- २३/५/२०२५

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७४७/२०२४**

श्री.अंबादास राजाराम तळणकर, — अपिलार्थी
रा.एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यलेखापाल,
विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
सहायक वनसरंक्षक-१,
विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्यलेखापाल, श्री.शे.अकबर शे.फरिद व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती एस.बी. फुले उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८७ | २०.०९.२०२३ | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४ (१) (ख) नुसार १७ बाबीची माहिती छायांकित प्रमाणित प्रतीत द्यावी, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने अवलोकन करणेबाबत दिनांक निश्चित करुन अवलोकनाकरिता सुचित केलेले आहे. त्यांनी सुचित केलेल्या दिनांकास कार्यालयात उपस्थित राहिलो असता त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यशाळेचा कार्यक्रम असल्यामुळे माहितीचे अवलोकन करता आलेले नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांना संपर्क केला असता त्यांनी असे अवगत केले की, अवलोकनाकरिता दिनांक निश्चित करुन परत अवलोकनाकरिता बोलविण्यात येईल. तथापि अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अवलोकनाकरिता दिनांक निश्चित करुन

अवलोकनकरिता अपिलार्थीस सुचित करणेबाबत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. सदर मागणी केलेली माहिती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने स्वंयप्रेरणेने कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अपिलार्थीस अवलोकन करणेबाबत सुचित केलेले आहे. तथापि कामाच्या व्यापात या बाबीची पुर्तता करता येणे शक्य झालेले नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम ४ (१) (ख) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने प्रगट करावयाची १ ते १७ मुद्यांबाबतची आहे. अधिनियमातील कलम ४ (१) (ख) नुसार, जी माहिती अधिनियमातील कलम ८ नुसार प्रकट करण्यास अपवाद ठरविण्यात आलेली आहे ती वगळून उर्वरित संपूर्ण माहिती ही प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाच्या दर्शनी भागावर स्वयंप्रेरणेने प्रगट करावयाची आहे. अशी माहिती प्रगट केल्यास अशा माहितीकरिता अर्जदार यांना माहिती अधिकारांतर्गत अर्ज करण्याची वेळ येणार नाही. पर्यायाने आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या व्दितीय अपिलांच्या संख्येवर नियंत्रण येईल. या सर्व बाबींकडे विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यांनी त्यांच्या अधिनस्त प्राधिकरणाची कलम ४ (१) (ख) नुसार ०१ ते १७ मुद्यांची अद्ययावत माहिती प्रकट केली असल्याबाबतची व्यक्तिश: खात्री करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास उलटटपाली सादर करावा.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यलेखापाल, विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12086 दिनांक : 23/9/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०९६०/२०२४
बोर्ड क्र.८४

श्री.बादशाह खान हिमायु खान, अपिलार्थी
रा.एसआरटी ७०, लेबर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अव्वल कारकून,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
अन्न धान्य वितरण अधिकारी,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.१०.२०२४ | तहसिलदार मेंडके दुलाजी व दिनेश शिवाजीराव झांपळे यांच्या आय.डी.ऑनलाईनवरुन निर्गमित झालेले रेशनकार्डची माहिती, जानेवारी २०२३ ते आजपर्यंत,<br>१.तहसिलदार मेंडके दुलाजी यांच्या आयडी वरुन मागील एक वर्षापासुन म्हणजेच जानेवारी २०२३ पासुन ते आजपर्यंत किती नवीन रेशनकार्ड, जुने रेशनकार्ड दुरुस्त केलेले रेशनकार्ड यांची आयडी वर ऑनलाईन कामकाज केलेले माहिती मिळणे,<br>२. तहसिलदार दिनेश शिवाजीराव झांपले यांच्या आयडीवरुन जो पर्यंत ड्युटीवर होते तो पर्यंत ऑनलाईन झालेले रेशनकार्डबाबत सर्व कामकाजाची माहिती मिळणेबाबत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हा पुरवठा अधिकारी, पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२४.१०.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. जिल्हा पुरवठा अधिकारी, पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12105 दिनांक : 23/9/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हा पुरवठा अधिकारी, पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११०३६/२०२४**
**बोर्ड क्र.८०**

श्री.कारभारी माणिकराव गाडेकर, — अपिलार्थी
रा. एलआयजी / ६६, पारिजातनगर, म्हाडा कॉलनी, तिसगाव,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अपर तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.१०.२०२४ | आम्ही दि.०१.१०.२०२४ रोजी आपल्या कार्यालयात दिलेल्या अर्जात विनंती केल्याप्रमाणे कार्यालयातील माहिती ज्यात, अ. मौजे तिसगाव गट नं.११८ मधील प्लॉट नं. अे-२६ चे फेर फार मध्ये झालेली चुक दुरुस्त केलेल्या फेरची प्रमाणित प्रत मिळणेबाबत, तिसगाव गट नं.११८ खाते क्र.११७२ फेर नं.१४२२८ मध्ये प्लॉट नं.२६ ची सिरीज अे व्यवस्थित टाईप झालेले नाही, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

माहिती पुरविण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.११.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७ / ७४ / प्र.क्र.१५४ / ०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

सत्यमेव जयते

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12106 दिनांक : 23/9/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०४७५ ते १०४७७/२०२४ (०३)**

श्री.खालेक महेमुद कुरेशी,
रा.राज गल्ली, मेन रोड, गेवराई, ता.गेवराई, जि.बीड

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७६ | १४.०६.२०२४ | जा.क्र.२०११/लो.दि./कावि/लोकशाही दिनानिमित्त दि.१४.०३.२०११ ची नक्कल व यातील खंडपीठ रिटपिटीशन क्र.२१६१/२०१२ मधील दि.११.०४.२०१२ रोजीचे म्हणणे व शपथपत्र,<br>१. जा.क्र.२०११/लो.दि./कावि/लोकशाही दिनानिमित्त या संचिकेत दि.१४.०३.२०११ रोजी तहसिलदार यांनी अर्ज निकाली काढलेल्या निर्णयाची प्रत,<br>२. याच संचिकेतील उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांना तहसिलदार यांनी रिट पिटीशन क्र.२१६१/२०१२ मध्ये दि.११.०४.२०१२ रोजीचे दिलेले म्हणणे व शपथपत्र, |
| ७७ | १४.०६.२०२४ | जा.क्र.२०२०/जमा-२/कावि९३४ तहसिल कार्यालय औरंगाबाद यांनी मंडळ अधिकारी वरुडकाझी यांना दि.०१.०९.२०२० रोजी दिलेल्या आदेशाची प्रत, |
| ७८ | १४.०६.२०२४ | २०१८/जमा-२/कावि २९१५ या प्रकरणातील नकला हव्या आहेत,<br>१. गणपत दांडगे व इतरांचा दि.१६.१०.२०१८ रोजीचा अर्ज,<br>२. तहसिलदार यांचे दि.२९.११.२०१८ रोजीचे पत्र, |

| | | |
|---|---|---|
| | | ३. तहसिलदार यांनी उपविभागीय अधिकारी यांना अहवाल देऊन अभिप्राय मागितलेल्या दि.१७.०७.२०१९ रोजीचे मार्गदर्शन व कार्यवाही करणे बाबतचे पत्र, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२५.०७.२०२४ रोजीच्या तीन प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७ / ७४ / प्र.क्र.१५४ / ०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.
४. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
५. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12107 दिनांक :- 23/9/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर